# ऋणनिर्देश

"कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे गावातील दलित आणि सवर्ण यांच्यातील संघर्ष : मांग समुदायाचा समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयावर लघुशोधप्रबंध लिहित असताना माझे आदरणीय गुरुवर्य प्रा. डॉ. रानोजी साळवे, प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे फार मोठे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तेव्हा त्यांचे सर्वप्रथम आभार मानणे मी माझे आद्य कर्तव्य समजते. त्यांनी मला वेळोवेळी सहकार्य करून शोधप्रबंध पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रेमळ व क्रियाशील सहकार्यामुळेच मी हा लघुशोधप्रबंध पूर्ण करू शकले. तेव्हा त्यांची मी मन:पूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील माझे गुरुवर्य डॉ. एस. ए. साळुंखे (विभागप्रमुख), डॉ. जे. बी. अंबेकर, डॉ. आर. बी. पाटील, प्रा. डी. श्रीकांत, प्रा. बी. एन. केंद्रे, प्रा. सुजाता गोखले, प्रा. प्रतिभा देसाई यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. विभागातील श्री. एस. बी. सुतार सर, श्री. पवारमामा यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

वास्तविक माझ्या शैक्षणिक जीवनात मार्गदर्शन व सहकार्य करणारे माझे वडील श्री. दत्तात्रय शंकर देशमुख, आई सौ. सुमित्रा देशमुख व आत्या अनुसया शंकर देशमुख यांच्या प्रेरणा व आशीर्वादामुळेच माझा लघुशोधनिबंध पूर्ण होवू शकला. तसेच भाऊ सचिन देशमुख व महेंद्र देशमुख यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची कायम ऋणी राहीन.

तसेच बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. पुजार सर, श्री. माटेकर सर, सौ. संध्या पाटील, सौ. शैलजा जाधव, सौ. नलिनी पाटील, सौ. सूर्यवंशी, श्री. महाजन सर, श्रीमती मोहिते व ग्रंथालयातील इतर सर्व कर्मचारी यांनी मला सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

वडणगे गावातील ग्रामसेवक श्री. के. बी. पाटील, तलाठी श्री. मोरे, सौ. कांचन वडणगेकर, श्री. घोरपडे सर, श्री. विलास भालेकर व वडणगेतील मांग

समुहातील सर्व सदस्यांनी सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून सहकार्य केल्याबद्दल मी त्या सर्वांची मन:पूर्वक आभारी आहे.

हा लघुशोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी माझे काका श्री. किशन कांबळे, त्याबरोबरच डॉ. चंद्रकांत भानुमते, (अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) व मैत्रिण सौ. शिला भानुमते सर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची कायम ऋणी आहे.

ज्यांच्या प्रेरणेमुळे व सहकार्याने हे कार्य पूर्णतवास नेण्यास साथ मिळाली ते माझे पती श्री. सत्यप्रिय म. कांबळे यांची मी मन:पूर्वक आभारी आहे. तसेच माझे सासरे श्री. महादेव सट्टूप्पा कांबळे, (माजी संचालक, गोकुळ दूध संघ, कोल्हापूर) व सासू सौ. अनुसया म. कांबळे, श्रीमती यल्लूबाई म. कांबळे आणि माझे मामा श्री. मायाप्पा गोविंद कांबळे यांच्या आशिर्वादाने व अनमोल सहकार्यामुळे माझा हा लघुशोधनिबंध पूर्ण होवू शकला त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहीन.

हा लघुशोधनिबंध पूर्ण करण्यासाठी माझे मित्र श्री. चंद्रकांत कदम, श्री. नाईकनवरे, श्री. प्रकाश नाईक, श्री. प्रदीप कांबळे, श्री. महादेव व श्री. श्रीधर, श्री. नितीन रणदिवे यांच्या अनमोल सहकार्याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे. तसेच मैत्रिणी प्रीती, शैला, कांता, निमा, सुषमा, स्मिता, अर्चना, शोभा, कमल, सुनिता, सुमन, नैना व सुवर्णा यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

सदरच्या लघुशोधनिबंधाचे टंकलेखन, झेरॉक्सिंग व बायडींगचे काम अत्यंत सुबकरीतीने व तत्परतेने करून दिल्याबद्दल प्राजक्ता टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर, पाचगांव, कोल्हापूरच्या सौ. सुषमा संजय पसारे यांची मी अत्यंत आभारी आहे.

एम. फिल. पदवीच्या सुयशाकडे वाटचाल करीत असताना पावलोपावली ज्यांनी ज्यांनी मला आनंदाने, जिव्हाळ्याने, सहृदयतेने मोलाचे मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले त्या सर्वांची मी ऋणी व मन:पूर्वक आभारी आहे.

धन्यवाद.

**कु. शीला दत्तात्रय देशमुख**
संशोधक